महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २६/२/२०१०

मा.स्थायी समिती विशेष सभा
सभा सुचना क्र.४ दिनांक २२/२/२०१०
सभा क्रमांक १ दिनांक २६/२/२०१०

ठाणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २६/२/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृहात सभा सुचना क्र.४ दिनांक २२/२/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजीत करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.चंद्रगुप्त सिताराम घाग | सभापती |
| २. | श्री.नागसेन (भैय्यासाहेब)गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ३. | श्री.पांडुरंग गोविंद पाटील | सदस्य |
| ४. | श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे | सदस्य |
| ५. | श्री.सुभाष आत्माराम खारकर | सदस्य |
| ६. | श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | सदस्य |
| ७. | श्रीमती सुरेखा सुरेश खातू | सदस्या |
| ८. | श्रीमती कविता सुरेश पाटील | सदस्य |
| ९. | श्री.दिनेश दाजी कांबळे | सदस्य |

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.राजन नारायण किणे | सदस्य |
| २. | श्री.सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| ३. | श्री.सुधीर विष्णू कोकाटे | सदस्य |
| ४. | श्रीमती सुहासिनी सुनिल लोखंडे | सदस्या |
| ५. | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |
| ६. | श्री.नजीब सुलेमान मुन्ना | सदस्य |
| ७. | श्री.यासीन अयुब कुरेशी | सदस्य |

वंदे मातरम्‌ने सभेस सुरुवात करण्यांत येते.

मा. सचिव सभेची विषयपत्रिका वाचुन सभेस सुरुवात करतात.

मा. सचिव प्रकरण क्रमांक ६ वाचुन दाखवितात.
मा. सचिव प्रकरण क्रमांक ७ वाचुन दाखवितात.
मा. सचिव प्रकरण क्रमांक ८ वाचुन दाखवितात.

श्री.नागसेन (भैय्यासाहेब) इंदिसे :-

मा.सभापती महोदय, प्रकरण क्रमांक ७ परिवहन समितीच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणेबाबतच्या विषयाच्या अनुषंगाने मी बोलत आहे. बीओटी तत्वावर सोल्युशन ॲड एजन्सीला स्टेनलेसस्टिलचे बसथांबे बसविण्याचे काम दिले होते त्यावेळी मी परिवहन समितीवर पदसिध्द सदस्य होतो. त्यावेळी मी माझ्या प्रभागात स्टेनलेसस्टिलचे बसथांबे बसविण्यांस सांगितले होते. परंतू त्यांनी अद्याप ते बसविले नाहीत यासंदर्भात काय करणार आहात ?

श्री.पेडणेकर :-

मा.सभापती महोदय, ११७ स्टेनलेसस्टिलचे बसथांबे बांधण्यासाठी त्याला यादी दिदलेली आहे .लोकेशनही दाखवलेले आहे. अद्यापपर्यत ८६ बसथांब्यांचे काम झालेले आहे. उर्वरित जागेवर बसथांबे बांधण्याचे काम चालू आहे.

श्री.नागसेन (भैय्यासाहेब)इंदिसे :-

मा.सभापती महोदय, माझ्या प्रभागातील बिल्डींग नं.४समोर, शास्त्रीनगर नाका, शिवाइर्ननगर सर्कल येथे स्टेनलेसस्टिलचे बसथांबे बांधावे अशी सुचना सभागृहामध्ये केली होती आणि त्याचे मिनिटस्‌ही केलेले आहे.तेथे त्याने ॲल्युमिनियमचे बसथांबे टाकले आहेत. आणि शास्त्रीनगर बालाजी हार्डवेअरच्यासमोर असलेला बसथांबा आहे त्याला फक्त पेंट केले आहे. एखाद्या सदस्याने त्याला दम देऊन किंवा विनंती करुन सांगितले,येथे स्टेनलेसस्टिलचे बसथांबे टाका म्हटल्यावर तेथे टाकले आहेत आणि मी सभागृहामध्ये मागणी केली आहे तसे मिनिटस्‌ झाले आहेत आणि माझ्या प्रभागात मी मागणी केलेल्या जागेवर स्टेनलेसस्टिलचे बसथांब टाकले नाहीत.

श्री.पेडणेकर :-

मा.सभापती महोदय, सदर ठेकेदाराला ताबडतोब नोटीस देण्यांत येईल.

श्री.नागसेन (भैय्यासाहेब) इंदिसे :-

मा.सभापती महोदय, नोटीस देऊन काय होणार आहे ?

श्री.दिक्षीत :

मा.सभापती महोदय, येत्या १५ दिवसांचे आत आपण आपल्या प्रभागामध्ये सुचविलेल्या जागेवर स्टेनलेसस्टिलचे बसथांबे बांधण्यासाठी त्याला सुचना दिल्या जातील.

मा.सभापती :-

सन्मा.सदस्या सौ.कविता पाटील यांनी आता येथे जो विषय मांडला तो महत्वाचा आहेच. परंतू हा विषय आताच्या सभेमधील होऊ शकत नाही कारण ही बजेटची सभा आहे त्यामुळे आपण बजेटबाबत बोलावे. आपल्या सुचना रास्तच आहे त यामध्ये वाद नाही परंतू हा आजचा विषय नाही.

सौ.कविता पाटील :-

मा.सभापती महोदय,मा.सभागृह नेते,मा.विरोधी पक्ष नेते,स्थायी समितीचे सर्व सदस्य,आणि सर्व अधिकारी वर्ग...

मला अर्थसंकल्पाबाबत बोलण्याचा अनुभव नाही. तरी मी थोडक्यात बोलण्याचा प्रयत्न करते. मा.आयुक्तसाहेबांनी स्थायी समितीकडे अर्थसंकल्प सादर केल्यानंतर गेले चार ते पाच दिवस स्थायी समितीचे सदस्य खातेनिहाय हया अर्थसंकल्पावर चर्चा करीत आहेत. आमचे जेष्ट सदस्य आहेत त्यांचे मताशी आम्ही सहमत आहोत. मा.सभापती साहेबांनी चांगले बजेट तयार केलेले आहे.त्यांना मी धन्यवाद देईन. श्री.घागसाहेब हे एक चांगले सभापती म्हणुन आमच्यापर्यत पोहोचले आहेत. प्रत्येक सदस्याने आम्हाला प्रत्येक कामामध्ये सहकार्य केले आहे. यापुढेही अशाचप्रकारे मदत राहील अशी मी आशा व्यक्त करते. आणि माझे दोन शब्द पुर्ण करते. जय हिंद जय जय महाराष्ट्र!

श्री.दिलीप बारटक्के :-

मा.सभापती महोदय, गेले चार ते पाच दिवस याठिकाणी बजेटवर चर्चा चालू आहे. सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन ही चर्चा झालेली आहे . या चचेच्याअनुषंगाने ठाणे शहरातील सर्व महत्वाची कामे होणार आहेत. लोकाभिमुख अर्थसंकल्प झालेला आहे.त्याबद्दल मी मा.सभापती,मा.महापौर,मा.आयुक्त,सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, सर्व सदस्य यांचे अभिनंदन करतो.सन २०१०-२०११ हया आर्थिक वर्षामध्ये या शहरातील कामांना दिशा मिळेल अशी आशा आहे. पुन्हा एकदा सभापती महोदय, आपण चांगला अर्थसंकल्प तयार केल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन आपले आभार मानतो. जय हिंद जय जय महाराष्ट्र !

श्री.हणमंत जगदाळे :-

मा.सभापती महोदय,गेले चार ते पाच दिवस आपल्या अध्यक्षतेखाली स्थायी समिमतीचे सर्व सदस्य महापालिकेतील सर्व खात्यांचे खातेप्रमुख,संबंधीत अधिकारी एकत्र बसून सन २००९-२०१० चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१०-२०११ चा मुळ अंदाजपत्रकास मान्यता देण्यासाठी खातेनिहाय चर्चा केली. सभापती महोदय, अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर वास्तविक सलग चार ते पाच दिवस त्यावर चर्चा करण्यासाठी बसण्याचा

प्रसंग पहिल्यांदाच आला. अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी आठ ते दहा दिवसाचा कालावधी लागतो. सर्व सदस्यांना अंदाजपत्रकाबद्दल माहिती ताबडतोब मिळते असे नाही. स्थायी समितीचे सदस्य म्हणुन आम्ही येथे बसल्यानंतर एक वर्षाचे अंदाजपत्रक आम्ही तयार करीत असतो. फार मोठया जबाबदारीने सभागृहामध्ये बसून प्रशासनाने सुचविवलेला अंदाजपत्रक व त्यामध्ये आम्ही सुचविलेली तरतूद एकत्र करुन अंदाजपत्रक तयार केले जाते. आणि तो आमचा अधिकारही आहे. अंदाजपत्रक तयार करीत असताना सभागृह नेते यांचा फार मोठा रोल असतो. आणि तेच प्रशासनाचे प्रमुख असल्याचा भास होतो. अंदाजपत्रकावर खातेनिहाय चर्चा करीत असताना, काही वेळा सदस्य व अधिकारी यांचेमध्ये शाब्दीक खडाजंगी होते. लोकनियुक्त सदस्यांना ते ज्या प्रभागातून निवडून आले आहेत त्या प्रभागातील नागरिकांची कामे व्हायला पाहिजेत असा त्यांचा कल असतोआणि प्रशासन हे शहरातील कामांबदद्ल विचार करीत असते. प्रशासनाचा व्यापक दृष्टीकोन असतो.लोकनियुक्त सदस्य हा माझ्या प्रभागातील कामे आहेत ती होतात किंवा नाही हेही सातत्याने बघत असतो. आणि मग आपण सुचविवलेली तरतूद, आपण सुचविलेला निधी आणि माझ्या प्रभागातील कामे होतील किंवा नाही याबद्दल तो साशंक असतो.आणि त्यामुळे कधी कधी अशाप्रकारे शाब्दीक वाद होतात.

सभापती महोदय, अर्थसंकल्प सादर होत असताना, नागरिकांच्या ज्या प्राथमिक गरजा आहेत,ज्यामध्ये पाण्याचा प्रश्न असेल, सार्व.शौचलय, गटारे यांचा प्रश्न असेल, नाले,विद्युत,रस्ते यांचा प्रश्न असेल. हे प्रश्न आणि अर्थसंकल्प या दोन बाजू वेगळ्या आहेत. अर्थसंकल्प तयार करीत असताना त्यामधुन एक चांगली योजना राबवू. करदात्या नागरिकांच्या मुलभूत गरजा भागवू तसेच माझ्या प्रभागातील कामे होतील असाही उद्देश असतो. सदस्याची भावना असते माझ्या प्रभागातील कामांसाठी तरतूद यामध्ये आहे किंवा नाही आणि असलेल्या तरतूदीमधुन सर्वांची कामे झाली पाहिजेत तशी प्रशासनाकडून तरतूद करवून घेण्याचे काम सभापती महोदय आपल्याला करावे लागते. आदरणीय सभागृह नेते यांचे मदतीने चांगल्यापध्दतीने आपण हे काम बजावलेले आहे.

ज्याज्या वेळी चर्चा चालू होती त्या त्या वेळी लेखाशिर्षाचा विषय आल्यानंतर त्या विषयाचा असणारा अभ्यास, आणि निश्चितप्रकारे आम्ही काय करायला पाहिजे हा असणारा कंसेप्ट समोर आल्यानंतर आम्ही यामधुन आमच्या भागाचा विकास करणार आहोत,त्याचबरोबर ठाणे महानगरपालिकेचे विश्वस्त या नात्याने अर्थसंकल्प हा शिल्लकी असला पाहिजे हया दृष्टीकोनातून पाहणेही आवश्यक आहे.आणि ती आपली जबाबदारी असते.आणि ती जबाबदारी आपण पार पाडत असतो.

सभापती महोदय, एक गोष्ट निश्चित लक्षात आली की, ज्यावेळी आपण खातेनिहाय चर्चा सुरु केली त्यावेळी उद्यान विभागाची चर्चा चालू झाली त्यावेळी अपु-या माहितीअभावी चर्चा पूर्ण झालीच नाही. महापालिकेची एकूण ७२ उद्याने आहेत त्यापैकी खाजगीकरणने किती उद्याने दिली आहेत याची माहिती नाही,तरणतलाव किती आहेत त्यांचे करारनामे मागितले तर ते आपल्याकडे उपलब्ध नाहीत. करप्रणालीबाबत बोललो तर तिकडे उत्पन्न किती आले विचारले असता, ४६%उत्पन्न आले. याची कारणे विचारली असता, कामगारांचा

विषय समोर आला. हा सर्व विषय पाहिला तर ज्या उणिवा आहेत त्या आपल्या डोळ्यासमोर आलेल्या आहेत. आणि मग चार दिवस चर्चा करुन तो अर्थसंकल्प मंजूर केला आणि आहेत त्या उणिवा तशाच राहिल्या तर केलेल्या चर्चेला अर्थ राहणार नाही.ज्या ज्या सुचना सदस्यांनी केल्या आहेत,ज्या ज्या उणिवा समोर आलेल्या आहेत त्याबाबत प्रशासनानेही तातडीने लक्ष घालावयाचे आहे. अगदी साधे उदाहरण आहे की,कामगारांच्याबाबतीत पदव्यप्त करण्याबाबतची भुमिका महापालिका उपआयुक्त मुख्यालय यांनी मांडली. पदव्यप्त करण्याबाबत ठराव आणित असताना, मंजूर पद आहेत ती भरण्यांत आली आहेत का१ ती पदे भरली जात नाहीत.त्यावेळी कॅफो यांनी असे सांगितले की, मा.आयुक्तसाहेबांचे असे म्हणणे आहे की,आस्थापनेचा खर्च आम्ही वाढवुन देणार नाही. त्याबाबत आम्ही सांगिगतले की, महापालिलकेमध्ये दोन हजार पदे रिक्त असतील,प्रत्येक खात्यामध्ये २५ ते ४०% पदांची कमतरता आहे. असे असताना,आम्ही आमचे उत्पन्नन वाढीचे उदिष्ट गाढू शकत नाही,आम्ही १००%पाणी व कर वसुल करु शकलो असतो तर आज किती कोटी रुपये उत्पन्न वाढले असते१ आणि हे उत्पन्न का वाढत नाही तर आमच्याकडे कर्मचारीवर्ग अपुरा आहे. मंजूर पद जर भरली तर आणि त्यांचे पगारावर होणारा खर्च आणि त्यांचेकडून काम करवून घेऊन मिळणारे उत्पन्न पाहिले तर ते जवळजवळ चार पट वाढेल. आमच्या कर्मचा-यांचे पगारावर सात कोटी रुपये खर्च होणार असतील तर आम्हाला उत्पन्न तीस ते चाळीस कोटी रुपये मिळणार आहे यादृष्टीकोनातून पाहिले जाणार आहे किंवा नाही१ महसुली उत्पन्न वाढवायचे असेल तर,खातेप्रमुख,संबंधित अधिकारी किंवा आयुक्त यांना जबाबदार धरुन जर चर्चा केली तर त्यामधुन आपण काहीही साध्य करु शकत नाही.

सभापती महोदय, आपल्याकडे ७२ उद्याने आहेत गेल्या वर्षीच आपण महापालिकेचा हरीत अर्थसंकल्प मांडला होता. हया उद्यांनामध्ये काय परिस्थिती आहे हे कोणालाही सांगता आले नाही. ८ उद्याने खाजगीकरणाने दिली आहेत त्यांची परिस्थिती काय ते माहिती नाही. दोन-चार उद्यांनाची माहिती मागितली ती देता आली नाही.असे असताना सार्वभौम अर्थसंकल्प आम्ही कसा म्हणू१ याला सार्वभौम अर्थसंकल्प म्हणता येणार नाही. ज्या गरजा आहेत त्या भागविण्याचे आम्ही काम के ले आहे. गरजा भागविण्यासाठी निधीची तरतूद करण्याचे काम आम्ही केले आहे हे अर्थसंकल्पामध्ये बघायला मिळेल.असे असणे योग्य नाही. निनश्चितप्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काम करीत असताना, शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून पावले उचलत असताना,शहरातील नागरिकांच्या प्राथमिक गरजा आहेत त्याबरोबर ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्यामध्ये उद्यान,रस्ते,कारंजे इ.गोष्टीकडे तेवढेच पाहिले पाहिजे आणि त्याचे नियोजन व्हायला पाहिजे.शहर विकास विभागाच्या बाबतीत सातत्याने आम्ही बोलत असतो की,१९९२ साली शहर विकास आराखडा मंजूर झाला. आराखडयाप्रमाणे कोणताही रस्ता झाला नाही.आजची शहारातील वर्दळ पाहिली, वाहतुकीची कोंडी पाहिली तर भयानक स्वरुप दिसेल. पोखरण रोड नं.१,२ येथे वाहतुकीची कोंडी किती होते ते बघायला मिळते. ठाणे शहरामध्ये गाडी घेऊन जाण्यास अडचण आहे. तीच परिस्थिती कळवा नाक्यावर आहे . यादृष्टीकोनातून पावले उचलली पाहिजेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये आपले आमदार यांनी सुचविले आहे की, येऊरसारख्या ठिकाणी आपले

जर धरण झाले तर त्यामधुनही आपल्याला खुप काही करता येईल. परंतू त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केल्याचे दिसुन येत नाही. स्वत:च्या मालकीचे धरण झाले तर पाणी पुरवठा चांगला करु शकू. आज आपण सात ते आठ रुपये दराने पाणी विकत घेऊन लोकांना देत आहोत. जर आमची स्वत:ची योजना असेल तर ते नागरिकांना साडेचार ते साडेतीन रुपये दराने मिळू शकेल. हया दृष्टीकोनातून प्रशासन विचार करणार आहे किंवा नाही१ अजून वेळ गेलेली नाही. अर्थसंकल्प महासभेमध्ये मंजूरीसाठी येणार आहे तेव्हातरी याबाबत विचार करावा.

झोपडपट्टी विकासाच्या दृष्टीकोनातून पाहिले तर फोटोपासच्याबाबतीत काय परिस्थिती आहे ते त्या खात्याच्या चर्चेच्या वेळी पाहिले आहे. १६६ झोपडपट्टया हया शासकीय निमशासकीय जागेवर आहेत. आणि जे ६६ फोटोपास दिले तेदेखील ज्याठिकाणी एसआरडीसारखी स्किम राबविण्यांत येते अशाच ठिकाणी फोटोपास देण्यांत आले. गरजवंतीनी ते फोटोपास दिले बिल्डरने बनवून दिलेले आहेत. त्याची गरज होती म्हणुन ते दिलेले आहेत. आमची मानसिकता आम्ही बदलली नाही. केंद् शासन आणि जय महाराष्ट्र शासनाचे धोरण काय आहे, झोपडपट्टीमुक्त शहर व्हावे असे धोरण आहे हे धोरण राबविण्याच्या दृष्टीकोनातून प्रशासनाने काय केले आहे १ त्यादृष्टीनेही पावले उचलणे गरजेचे आहे.आणि त्या दृष्टीने पावले उचलाल अशी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, प्रत्येक खातेनिहाय बोलायचे झाले तर खुप काही आहे .परंतू सभागृह नेते यांनी मगाशीच सांगितले आहे की, आपणच एकत्र बसून चर्चा करुन अर्थसंकल्प तयार केला आहे त्यामुळे त्यावर वेगळे काही बोलण्यासारखे काही नाही. मी बोललो तेवढे भरपूर असेल त्यामध्ये निश्चित प्रकारे मी सांगेन, अर्थसंकल्प हा सार्वभौम असावा,आणि शहराच्या विकासाच्या दृष्टीने चेहरा घेऊन असलेला अर्थसंकल्प असावा.त्यामध्ये कोणतातरी एक ठोस संकल्प असावा.एवढीच मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, गेल्या वर्षभराच्या कालावधीमध्ये आपण स्थायी समिती सभापतीपदी विराजमान झाल्यापासुन स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन चांगल्याप्रकारे येथे काम केले आहे. सभागृह नेते श्री.पांडुरंग पाटील, आपण स्वत: आणि मी सुध्दा आपला हा स्थायी समिती सभागृहातील सदस्य म्हणुन बोलण्याचा शेवटचा दिवस आहे. चर्चेच्या ओघाओघामध्ये बोलत असताना, सदस्य व अधिकारी यांचेमध्ये वैयक्तिक कोणताही हेवादावा नसतो. परंतू तो प्रश्न हा संबंधित अधिका-याशी असतो आणि त्यांचेकडून उत्तर योग्य आले नाही किंवा काम झाले नाही तर वाद निर्माण होतात. परंतू त्यामध्ये जाणुनबुजुन बोलले जात नाही. त्यामुळे मी प्रशासनातील अधिका-यांना सांगेन की, वैयक्तिक माझ्याकडून दोन वर्षाच्या काळामध्ये चर्चेच्या ओघामध्ये कोणाला त्रास जरी झाला असेल, मानअपमान झाला असेल तर क्षमस्व मागेन.दिलगिरी व्यक्त करेन.आपण दिलेले सहकार्य यापुढेही असेच आम्हाला राहिल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि सभापती महोदय, आपल्याला आणि आपल्या सर्व सहकार्यांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो आणि रजा घेतो. जय हिंद जय जय महाराष्ट्र!

श्री.पांडुरंग पाटील :-

मा.सभापती महोदय,सन्मा.विरोधी पक्ष नेते श्री.जगदाळेसाहेब, स्थायी समितीचे सर्व सन्मा.सदस्य, उपआयुक्त,सर्व अधिकारी वर्ग....

मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सोमवारी दुपारी ३.०० वाजल्यापासुन कालच्या गुरुवारपर्यत जवळजवळ सकाळी ११ ते रात्री ७.३० वाजेपर्यत सर्व स्थायी समिती सदस्यांनी विरोधी पक्ष नेत्यासहीत सर्वांनी हया चर्चेमध्ये भाग घेतला. चर्चा करीत असताना विरोधी पक्षाकडून असे कुठेही वाटले नाही की, हा अर्थसंकल्प शहराला दिशा देणारा नाही. हा प्रशासनाकडून तयार करुन आलेला अर्थसंकल्प असतो तो अर्थसंकल्प शहरासाठी साधक असावा आणि खातेनिहाय चर्चा करीत असताना कुठेही अनाठायी खर्च होवू नये, जमेच्या बाजूकडून जास्तीत जास्त जमा कशी होईल हा दृष्टीकोन असतो. परंतू माझे मित्र श्री.जगदाळेसाहेबांनी एक शंका व्यक्त केली, हा शहराला दिशा देणारा अर्थसंकल्प नाही. जरी हा अर्थसंकल्प आपल्याला दिशा देणारा वाटत नसला तरी आमच्यादृष्टीने हा दिशा देणारा अर्थसंकल्प आहे. येत्या वर्षभरामध्ये नागरिरकांच्या मुलभूत गरजा ज्या आहेत, अन्न,पाणी,निवारा याचेसाठी जास्तीत जास्त तरतूद हया अर्थसंकल्पामध्ये करण्यांत आल्याचे आम्ही पाहिले आहे . विशेषत: हया अर्थसंकल्पामध्ये आपण नागरिकांवर कराचा आणिा दराचा बोजा टाकलेला नाही. वास्तविक प्रशासनाची इच्छा होती,तरी नागरिकांवर कोणताही दरवाढ ,करवाढ न टाकता हा अर्थसंकल्प जनतेसाठी मांडीत आहोत. चार दिवसामध्ये चर्चा करीत असताना सुधारीत अर्थसंकल्प आहे त्यावर सदस्यांनी चर्चा करुन जवळजवळ २७,९३,०००/-रुपयांची उत्पन्नामध्ये वाढ दाखविली आहे.आयुक्तांनी सादर केलेला मुळ अर्थसंकल्प जो आहे तो १११६,७१,००,०००/-**रुपयांचा आहे . आणि स्थायी समितीने तयार केलेला अर्थसंकल्प आहे तो रु.११६१,७१,०७,२३६/-चा आहे. आणि सदस्यांनी चर्चा केली तर ११६१,९९,०२,२३६/-** अशाप्रकारे २७,९३,०००/-रुपयांचे उत्पन्न या चर्चेद्वारे वाढविले आहे . सुधारित अर्थसंकल्प मंजूर करीत असताना, काही बाबींवर आम्हीदेखील निश्चित समाधानी नाही. परंतू खातेप्रमुखांबरोबर चर्चा करीत असताना लक्षात आले की, एका एका अधिका-याकडे चार ते पाच तर काही अधिका-यांकडे सात ते आठ खात्यांचा अभिभार दिल्यानंतर त्या अधिका-याला त्या त्या खात्यांकडे लक्ष देण्यासाठी निश्चितच वेळ अपुरा पडतो. जरी ते अधिकारी कार्यक्षम असले तरी ते कशाप्रकारे वेळ प्रत्येक खात्याकडे द्यायचा१ त्या अधिाका-याने साईट व्हिजीट कधी करावयाची१ निश्चित प्रशासन याचा बोध घेईल. नेहमीच कर्मचारी भरती करीत असताना किंवा अधिका-यांना पदोन्नती देत असताना, प्रशासन जे.एम.एम.यु.आर.एम.चे कारण पुढे करीत आहे . परंतू तुम्ही त्यांचे म्हणण्यानुसार स्थायी आस्थापना वाढविणार नसलात तरी या महापालिके चा कारभार चोख व्हावा,पारदर्शक व्हावा,कामामध्ये नियोजन असावे यासाठी प्रत्येक खात्याला अधिकारी स्वतंत्र नेमणे अपेक्षित आहे. ठाण्यातील एखाद्या नागरिकाला,किंवा एखाद्या नेत्याला किंवा नगरसेवकला त्या खात्याच्या अधिका-याला भेटावयाचे असेल त्याचेशी कामाबाबत चर्चा करावयाची असेल तर तो अधिकारी त्यावेळी दुस-या खात्याच्या कामामध्ये असतो. नागरिकांची याबाबत नाराजी असल्याचे आपण

ऐकतो. याठिकाणी आपण काही ठोस निर्णय घेतले आहेत. महापालिकेची पाण्याची स्वतंत्र योजना असावी. मगाशी सन्मा.सदस्य श्री.भैय्यासाहेब इंदिसे यांची परिवहन सेवेच्या कारभाराबद्दल किंवा बसथांब्याबद्दल प्रश्न उपस्थित केला.आतापर्यंत परिवहन सेवेला बसेस नसल्यामुळे ही सेवा सर्व नागरिकांपर्यंत देऊ शकत नाही असे सांगता आले. परंतू ज्यावेळी या वर्षामध्ये २०० बसेस परिवहनकडे उपलब्ध होतील त्यावेळी ही सबब तुमच्याकडून ठाण्यातील नागरिक ऐकणार नाहीत.त्याचे नियोजन तुम्ही आताच करणे आवश्यक आहे. परिवहन सेवेसाठी महापालिकेने आतापर्यंत काय दिले नाही असे नाही, कामगारांचे पगारदेखील महापालिकेने दिले आहेत. ज्या काही मागण्या आयुक्तांकडे केल्या होत्या,आणि आयुक्तांनी त्या मागण्या जशा आमच्याकडे हया अर्थसंकल्पामध्ये मांडल्या आहेत तशाच आम्ही त्या मंजूर केल्या आहेत. इतर कामासाठी जवळजवळ १० कोटी रुपये दिले आहेत. आणि नविन बसेसचे कर्जाचे सर्व हप्ते महापालिका भरणार आहे. जवळजवळ २३ कोटी रुपयांचा वार्षिक हप्ता आहे.एकूण ३३ कोटी रुपयांची मदत महापालिकेकडून मिळत आहे. शिक्षण मंडळाच्या बाबतीत आम्ही वेगळा निर्णय घेतला आहे की, नेहमीच शाळांची स्वच्छता आणि सुरक्षा ही ठेवली जात नाही म्हणुन एक स्वतंत्र एजन्सी महापालिकेमार्फत नेमून सुरक्षारक्षक देऊन ज्या काही तकारी आहेत त्या तक्रारींचे निवारण कशाप्रकारे करता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. बरीचशी खाती अशी आहेत की, त्यांचेकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष झालेले आहे. या शहरातील मोबाईल टॉवर असेल,स्थावर मालमत्ता असेल,वास्तविक स्थावर मालमत्ता विभागाकडे वेगळया नरजेने पाहिले जाते, कल्याण-डोंबिवलीसारखी ठाणे महानगरपालिकेपेक्षा छोटी असलेली महापालिका स्थावर मालमत्ता विभागाकडून १७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवते आणि आपले उत्पन्न पावणे दोन कोटीच्या आसपास आहे. मी निश्चितच कल्याण-डोंबिवली महापालिकेचे कौतुक करेन. परंतू ज्या काही प्रॅापटर्या ठाणे महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागाकडे कराच्यापोटी जप्त करण्यांत आलेल्या आहेत. वर्षानुवर्षे हया जागा आपल्या ताब्यात आहेत तेथील काही टेणंट आपल्याकडे भाडे भरीत आहेत. त्या जागा आपण जर डेव्हलप केल्या तर आपण जे.एन.एम.एम.यु.आर.एम.आणि बी.एस.यु.पी.योजनांसाठी आपल्याला जो पैसा कमी पडत आहे तो या मालमत्तामधुन निधी उभा करु शकतो आणि त्यामुळेच हया योजनांसाठी आपण जे कर्ज घेणार आहोत ते घेण्याची आवश्यकता भासणार नाही. ठाण्याच्या विकासाच्यादृ्ष्टीकोनातून ज्या योजना आहेत त्याला हातभार लावू शकतो. श्री.जगदाळेसाहेब आपण म्हटलेत की, विकासाची दिशा दिसत नाही, परंतू ज्यावेळी उत्पन्नाची साधन बंदीस्त होतात त्यावेळी आपल्या अस्तित्वात असलेले ज्या योजना आहेत,ज्या जागा आहेत त्यामध्येच उत्पन्न शोधण्याचा प्रयत्न करतो. म्हणुन आपण नवीन निर्णय घेतला की, टी.पी.पी.द्वारे ज्या महापालिकेच्या जागा आहेत त्या बी.ओ.टी.तत्वावर विकसीत करावयाच्या. यासाठी आपण स्वतंत्र सेल निर्माण करीत आहोत. हा सेल निर्माण करीत असताना, आणि नविन वर्षामध्ये शैक्षणिक धोरण अवलंब करीत असताना जवळजवळ ६० ते ६५ कोटी उत्पन्नाची भर पडत आहे. तसेच महापालिकेच्या जेवढया

१२८शाळा आहेत परंतू इमारती ८६ आहेत.त्या ८६ इमारती शहरामध्ये बाजारपेठांमध्ये अगदी मोक्याच्या ठिकाणी आहेत. दिवसेंदिवस शाळांमधील हजेरी पट कमी होत आहे. ब-याच इमारतीमधील वर्गखोल्या बंद आहेत.अनेक महिने खोल्या बंद राहिल्याने त्यांचे मेंटनन्सचे प्रमाण वाढत आहे.्म्हणुन हया इमारतीमध्ये तळमजल्यावर कमशिर्यल सेल निर्माण करावा, जेणेकरुन शिक्षण मंडळाला महापालिकेकडू न जो निधी द्यावा लागतो तो कमी होईल आणि शिक्षण मंडळही स्वायंत्त होईल. त्या ठिकाणी जे गाळे उपलब्ध होतील ते बँका,किंवा इतर कार्यालये यांचेसाठी देण्यांत याव्या. उत्पन्नाची जी स्तोत्र आहेत त्याला प्राधान्य देण्यासाठी आपण निश्चित प्रयत्न केला आहे.अनधिकृत बांधकामाबाबत बोलताना केवळ मुंब्रा येथील २१४ अनधिकृत बांधकामे तोडली. ही बांधकामे तोडताना महापालिकेचा जो खर्च आला त्यामध्ये मॅनपॉवर,मशिनरी तसेच वेळ याचा विचार केला तरी ३५लाखापर्यत हा खर्च आहे.त्याचवेळी खातेप्रमुखाने सांगितले की, ५८ लाख रुपये दंडात्मक शुल्क येणे बाकी आहे. गेल्या एक -दोन वर्षामध्ये जी काही अनधिकृत बांधकामे तोडण्यांत आली त्यांचेवर दंडात्मक कारवाई करुन शुल्क लावताना आम्ही काटसर करतो किंवा दंडात्मक शुल्क वसुल करण्यासाठी कुठेतरी आपल्याला वेळ होत आहे, विलंब होत आहे त्यामुळे हे शुल्क आपल्याला वेळेवर मिळत नाही. यामध्ये आपण कमी पडतो याकडे प्राधान्य देणे आवश्यक आहे.अनधिकृत बांधकामांवर जरब बसणेही अपेक्षित आहे. बांधकाम तोडल्यानंतर दोन महिन्यामध्ये पुन्हा तेथे ती इमारत उभी राहते.ती उभी राहणार नाही. ठाण्यातील नागरिक आपल्याकडे आज कोणत्या नजरेने पाहत आहे१ ती इमारत का उभी राहत आहे हे नागरिकांच्या लक्षात येत नाही, मॅनपॉवर कमी आहे हे तुम्ही आम्ही समजू शकतो.परंतू नागरिक समजत नाही. जे जे तुम्ही आमच्याकडे मागाल ते देण्याचा आम्ही प्रयत्न करु. परंतू प्रयत्न करीत असताना प्रशासनाकडून जैसे थे ची परिस्थिती आहे ती अपेक्षित कशी राहील यासाठी पाठपुरावा होणे अपेक्षित आहे. पाण्याबाबत तोच प्रश्न आहे. मा.सभापतींच्यासमोर निर्णय झालेला आहे. ८५ कोटी रुपयांचे उत्पन्न पाणी खात्याकडून अपेक्षित असताना, आज ४५%सुध्दा उत्पन्न मिळेल किंवा नाही याची शाश्वती नाही.हे अपेक्षित उत्पन्न आहे. नागरिकांकडे आपली बिल पोहोचत नाहीत आणि म्हणुन अपेक्षित उत्पन्न मिळत नाही कारण निश्चित दोन्ही खाती समन्वयाची भुमिका बजावतील आणि अपेक्षित उत्पन्न महापालिकेला मिळेल अशी अपेक्षा करायला हरकत नसावी. या शहराकडे एक विकसीत होणारे शहर म्हणुन पाहिले जात आहे. डी.सी.रुलमध्ये तरतूद असूनसुध्दा इमारतीचा आराखडा मंजूर केला जातो. आराखडा मंजूर करण्यापर्यतच आपली जबाबदारी आहे अशाप्रकारे कामकाज आतापर्यत झाले. एखादी इमारत ज्या वेळी कोसळते त्यावेळी नागरिक त्या बिल्डरला दोष देत नाहीतर महापालिकेला दोष देत आहे. कारण त्याला वाटत असते की, ही महापालिकेचीच चूक आहे. बिल्डर कोणत्या प्रकारचे स्टील वापरत आहे,सिमेंट रेती कशाप्रकारे वापरत आहे मिकसींग कशाप्रकारे वापरतो याची पाहणी करणेही आपल्या इंजिनिअरची जबाबदारी आहे. परंतू हया जबाबदा-या आतापर्यत पार पाडलेल्या नाहीत म्हणुन स्वंतत्र सेल,स्वरचना परिक्षण, स्ट्रक्चरल ऑडीट आपण निर्माण करतो. या शहरामधील मध्यमवर्गीय असेल किंवा गरीबातील गरीब असेल तो कर्ज काढुनच

फ्लॅट घेत असतो त्याला शाश्वती वाटेल,आपण राहत असलेल्या इमारतीचे, सदनिकेचे महापालिकेने निरिरक्षण केलेले आहे . या इमारतीचे आयुष्य तरी कमीत कमी २५ ते ३० वर्षे असेल. गेल्या दोन ते तीन वर्षामध्ये सतत पाण्याच्या अनधिकृत कनेक्शनबाबत चर्चा होत आहे. त्यांना दंडात्मक शुल्क आकारणी करुन मुळ प्रवाहात आणावे म्हणुन महासभेने धोरणात्मक निर्णय घेतला आणि साडे तीन हजार रुपये भरल्यानंतर त्यांचे कनेक्शन हे मंजूर करावे अशी भुमिका घेण्यात आली. परंतू हे करीत असतानासुध्दा बरेचसे नागरिक यामध्ये सहभागी झाले नाहीत. अजूनही नऊ प्रभाग समितीचा आढावा घेतला असता, मोठया प्रमाणात अनधिकृत कनेक्शन पाण्याची आहेत हे दृष्टीपथास आले. म्हणुन आम्ही एक नविन ठराव याठिकाणी मंजूर करुन घेत आहोत जे झोपडीधारक आहेत त्यांना एक हजार रुपये आणि जे सदनिकाधारक आहेत त्यांना तीन हजार रुपये ही मुदत फक्त तीन महिने राहील. तीन महिन्यामध्ये जर का तो अनधिकृत कनेक्शनधारक यांनी आपले कनेक्शन मंजूर करुन घेतले नाही तर हे शुल्क आहे ते तीन महिन्यानंतर हे शुल्क एक हजाराचे दीड हजार रुपये आणि तीन हजाराचे पाच हजार रुपये शुल्क होईल. असा एक संदेश प्रसिध्दीच्या माध्यमातून प्रशासनाकडून राबवावा अशी एक माफक अपेक्षा आहे. चर्चा करीत असताना, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या नागरिरकांना वेळेवर आणि योग्य औषध पुरवठा होत नाही असे सन्मा.सदस्य श्री.खारकर व श्रीमती खातु मॅडम यांनी मुद्दा उपस्थित केला. जवळजवळ १७० प्रकारची औषधे आपण बाजारातून मागवतो. निविदा मागवितो परंतू प्रत्यक्षात ११८ औषधे आपल्याला बाजारात मिळतात. परंतू नवीन नवीन कंपन्या या देशामध्ये निघत असताना, त्याचे स्मॅपल डॉक्टरांकडे येत असल्याने रुग्ण डॉक्टरांकडे येतात तेव्हा डॉक्टर नवीन औषधांचेच टिपण रुग्णाला करुन देतो जुन्या औषधाचे टिपण्णी करुन देत नाही. कालबाहय होणारी औषधे न मागवता प्रचलित कंपन्याकडून प्रचलित औषध रुग्णांना द्यावी लागतात तीच औषधे मागवावीत याबाबत स्थायी समितीच्या सर्व सदस्यांचे एकमत झ ालेले आहे.त्याप्रमाणे संबंधित विभागाने याची दक्षता घ्यावी जेणेकरुन कुठल्याहीप्रकारे याबाबत बोंबाबोंब होणार नाही अशी आम्हाला खात्री वाटते. महापालिकेमध्ये बोर्डाचे जवळजवळ २१३ सुरक्षारक्षक आहेत. आणि त्यांना दरमहा आठ हजार रुपये पगार द्यावा लागतो. तो सुरक्षारक्षक खाजगी संस्थेकडून घेतला तर पाच हजार रुपयांमध्ये सुरक्षारक्षक उपलब्ध होतात. बोर्डाकडून येणा-या सुरक्षारक्षकावर महापालिकेचे नियंत्रण नसते. त्यांचा एक स्वतंत्र सुपरवायझर या शहरामध्ये आहे. कारण कुठल्याही प्रकारची चाचणी न घेता तो सुरक्षारक्षक आपल्याकडे पाठविला जातो, काही सुरक्षारक्षक असे दिसतात की, त्यांचे वजन ३५ किलोदेखील नसेल. असे सुरक्षारक्षक बोर्डाने पाठविले ते आपण स्विकारायचे का शिक्षण मंडळाला एक पत्र प्राप्त झालेले आहे आम्ही तुम्हाला सुरक्षारक्षक पुरवू शकत नाही तुम्ही खाजगी संस्थेकडून सुरक्षारक्षक घ्या. त्या पत्राचा आधार घेऊन आणि महापालिकेच्या होणा-या अनाठायी खर्चामध्ये बचत करण्याच्या दृष्टीकोनातून एखाद्या चांगल्या संस्थेकडून सुरक्षारक्षक मागवावेत आणि बोर्डाचे सुरक्षारक्षक परत पाठवावेत. निधी वाचविण्याच्या दृष्टीकोनातून हे अपेक्षीत आहे . एका सुरक्षारक्षकावर आपले तीन हजार रुपये जास्त खर्च होत आहे. खाजगी संस्थेकडून सुरक्षारक्षक घेतल्यास तेवढयाच खर्चात जास्त सुरक्षारक्षक

उपलब्ध होऊ शकतील. पाणी खात्याचीही सुरक्षारक्षक मिळावेत म्हणुन मागणी आहे. या शहरामध्ये ३७ जलकुंभ आहेत तेथे सुरक्षारक्षक आवश्यक आहेत तेथे सुरक्षारक्षक नाहीत. आज आपण ठाणे मुंबई परिसरामध्ये जी परिस्थिती पाहत आहोत, पाणी खात्याला पोलिस खात्याचेही पत्र आलेले आहे की, पाण्याच्या टाक्या आहेत तेथे संरक्षण ठेवावे. तेथे सुरक्षारक्षक नेमा परंतू प्रशासनाने मॅनपॉवर नसल्याने अजुनपर्यंत सुरक्षारक्षक दिलेले नाहीत. ज्या ज्या ठिकाणी सुरक्षारक्षक कमी पडत आहेत तेथे सुरक्षारक्षक देण्यासाठी त्याच निधीमध्ये जास्त सुरक्षारक्षक मागविता येतील. पाणी खात्याची असलेली सुरक्षारक्षकांची मागणी पुरविली तर त्यांना न्याय दिला जाईल. श्री.जगदाळेसाहेब आपण मगाशी सांगितले की, गार्डन विभागाने बगीच्यांची निगा देखभाल करण्यासाठी आठ संस्थांची नेमणूक केली आहे. आणि खरोखर तेच बगीच्या सुस्थितीत दिसतील. खात्याकडे इतर गार्डनविषयी विचारणा केली असता, कर्मचारी अपुरा असल्यामुळे तेथे देखभाल करण्यासाठी आम्हाला अडचण निर्माण होत आहे, असे सांगितले जाते. म्हणुनच आणखी आठ बगींच्याची देखभाल व निगा राखण्यासाठी संस्थेकडे देण्यासाठी त्यांनी प्रस्ताव तयार केला आहे. ७२ बगीच्यांना दुरुस्ती आणि देखभालीसाठी दीड कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतू जर का १६ एजन्सींना दुरुस्ती देखभालीसाठी काम दिले तर खर्चही एक कोटी दहा लाखाच्या आसपास येईल.याचा अर्थ महापलिकेकडून एखादे काम होते तेव्हा खर्च जास्त होतो. आणि ते काम एखाद्या संस्थेमार्फत करण्याचा प्रयत्न केला तर खर्च अटोक्यात येतो. आणि दर्जाही चांगला मिळतो. हे नाकारता येणार नाही. शहराच्या मोक्याच्या ठिकाणी असलेली उद्याने आहेत त्यांची निगा देखभाल ठेवण्यासाठी आपल्याकडे मनुष्यबळ नाही म्हणुन दुर्लक्ष होत आहे अशी उद्याने प्रायोजकांना किंवा निरनिराळ्या संस्थाना निगा देखभालासाठी देण्यांत यावीत, अशी मागणी स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी येथे केली आहे. ठाणे शहराचे भुषण असलेले दादोजी कोंडदेव स्टेडियम हे ब-याच वर्षापासुन आहे. याठिकाणी फक्त एकदाच रणजी स्पर्धा झालेली आहे. कुठलेही क्रिकेटचे सामने हया स्टेडियममध्ये झालेले नाहीत. त्यामध्ये काही निरनिराळ्या अडचणी असतील त्यामध्ये राजकीय इच्छा शक्ती असेल, किंवा इतर काही बाबींमुळे जे ठाण्यातील नागरिकांना अपेक्षित आहे त्या अपेक्षा पुर्ण करण्यासाठी आपण कुठेतरी कमी पडत आहोत हे सांगण्यास मला कोणत्याहीप्रकारे संकोच वाटत नाही. म्हणुन दादोजी कोंडदेव स्टेडियमचे खाजगीकरण करण्यांत यावे. प्रायोगिक तत्वावर हया स्टेडियमची निगा व देखभालीचे जो वार्षिक तीन ते चार कोटीचा भार आपल्यावर पडतो तोही निधी वाचेल. आणि ठाणेकरांना अपेक्षित क्रिकेटच्या स्पर्धा असतील त्या निश्चित यापुढे होतील असे वाटते. दुसरा विषय आहे, राजीव गांधी वैद्यकिय मेडिकल कॅालेजचा १९९४ साली सदरचे कॅालेज तत्कालीन महापौर श्री.नईम खान यांचे हस्ते व राष्ट्रपतींच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले आहे. आज कॅालेज ठाणे महापालिका चालविते आणि त्यातील सर्व सिट्स महाराष्ट्र शासन भरते. ज्या मुळ संकल्पनेने हे कॅालेज सुरु केले ती म्हणजे हया महापालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांना तेथे शिक्षण घेता यावे परंतू हया मुळ धोरणाला अडथळा केला आहे. महापालिका परिक्षेत्रतील विद्यार्थ्यांना तेथे ॲडमिशन मिळत नाही. वास्तविक

कॅालेज स्थापन केले त्यावेळी असा निर्णय झाला होता की, महापालिका परिक्षत्रातील विद्यार्थ्यांसाठी ५०% आणि परिक्षेत्रातील विद्यार्थी ५०% याप्रमाणे ॲडमिशन देण्याची मुळ संकल्पना होती. म्हणुन राजीव गांधी वैद्यकिय कॅालेज आहे तेथे ट्रस्ट स्थापन करण्यांत यावे. त्या त्या वेळेचे आयुक्त व त्या त्या वेळेचे पदाधिकारी हे त्या ट्रस्टमध्ये असतील.मला वाटते या देशामध्ये गुजराथ राज्यामधील महापालिकांमध्येही १९४९ चा मुंबई प्रांतिक ॲक्ट वापरला जातो. आताच सुरतलाही परवानगी मिळाली आहे. आपल्यालाही शासनाकडून परवानगी घेण्यासाठी शासनाकडे प्रयत्न करावा लागेल. १८ कोटी रुपये हया कॅालेजवर आपण खर्च करीत आहोत तोही खर्च करावा लागणार नाही आणि मुळ संकल्पना आहे त्यालाही चालना मिळेल. राजीव गांधी वैद्यकिय कॉलेजसाठी ट्रस्ट स्थापन करण्यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर कार्यवाही करावी.

सभापती महोदय, हया अर्थसंकल्पामध्ये निरनिराळया योजना सर्व सदस्यांनी मांडल्या. चर्चेमध्ये सर्वांनी भाग घेतला आणि हा अर्थसंकल्प कशाप्रकारे परिपूर्ण होईल,नागरिकांवर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा न टाकता सर्व सदस्यांनी मनापासून प्रयत्न करुन या चर्चेमध्ये भाग घेतला आहे,या अर्थसंकल्पामध्ये जेष्ठ नागरिकांसाठी विम्याचे संरक्षण दिले आहे. बेरोजगारांसाठी लोकसेवा केंद्र स्थापन करण्यासाठी तरतूद केली आहे. हे लोकसेवा केंद्र स्थापन करताना या शहरामध्ये लहानमोठया चो-या होतात,एखाद्या नागरिकांला प्लंबर हवा असेल,टी.व्ही.दुरुस्त करण्यासाठी कारागिर हवा असेल तर त्यासाठी तो एखाद्या दुकानामध्ये जातो किंवा नाक्यावर जातो आणि घेऊन येतो तो कोणाच्या परिचयाचा नसतो,निरनिराळया प्रभाग समित्यांमार्फत हे लोकसेवा केंद्र सुरु करुन त्या विभागातील प्रशिक्षीत सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना हत्यारे पुरविण्याची तरतूद केली आहे. महापालिका त्यांना ओळखपत्र देईल आणि पुणे महापालिकेच्या धर्तीवर सर्व प्रकारचे दर आहेत त्यामध्ये वायरमन,प्लंबर,गवंडी, या सर्वांचे दर ठाणे महापालिका निश्चित करेल त्यामुळे नागरिक आणि तो कारागिर यांचेमध्ये वाद किंवा तंटा होणार नाही. त्यांच्याकडे जाणारा कारागिर हा महापालिकेचे ओळखपत्र असणारा जाणार आहे त्यामुळे घरामध्ये होणा-या चो-याचे प्रमाण कमी होईल.८०० ते १००० लोकांना आपण महापालिकेमार्फत रोजगार उपलब्ध करुन देऊ त्यांना कोणत्याही प्रकारचा पगार महापालिकेला द्यावा लागणार नाही. कारण त्या नागरिकांकडूनच त्यांना फी मिळणार आहे. त्यामुळे महापालिका राबवित असलेल्या उपक्रमांना चालना देण्याचा आपण प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, मागील वर्षामध्ये आपण हया सभापतीच्या खुर्चीमध्ये विराजमान झालात तेव्हापासुन आतापर्यंत निरनिराळे विषय हाताळताना आम्ही पाहिले आहे.

सभागृहातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांचेशी आपण समविकल विचार करुन प्रत्येक आठवडयाच्या स्थायी समिती सभा हया परिपूर्णत्वास नेलेल्या आहेत. त्यामुळेच या एका वर्षामध्ये आपण कामकाज करीत असताना, आपल्याला सभापती म्हणुन कोणत्याही अडचणीला सामोरे जावे लागले नाही. हे आपले पद वादादीत राहिले नाही, हे आमच्याबरोबरच विरोधी पक्षानेही मान्य करावे. आपण सर्वांशी सलोख्याने वागलात म्हणुनच हे होऊ शकले. प्रशासनाने पाठविलेला अर्थसंकल्प आणि सदस्यांनी सुचविलेल्या सुचना त्यांचा अंतर्भाव या अर्थसंकल्पामध्ये आपण केला म्हणुन सदस्यांनी केलेल्या सुचनेसह हा अर्थसंकल्प मंजूर करुन महासभेकडे शिफारस करावा अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>मा.सभापती :-</u>

मा.सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते,प्रभारी आयुक्त,अति.आयुक्त,कॅफो,व अन्य अधिकारी आणि स्थायी समितीचे सर्व सदस्य ...

मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सर्व पदाधिकारी व सदस्यांनी जवळजवळ पाच दिवस सतत चर्चा करुन अर्थसंकल्पाची मांडणी केली. व आज आपण अर्थसंकल्प मा.महासभेकडे मंजूरीसाठी शिफारस करीत आहोत. अर्थसंकल्प सादर करताना,तसेच मी सभापती झाल्यापासुनचा माझा कार्यकाळ हा उत्तमरित्या पार पडला असेल अशी माझी अपेक्षा आहे. सदस्य पदावरुन अध्यक्षपदावर आल्यानंतर वागण्याची पध्दत आणि सदस्य पदावर असताना वागण्याची पध्दत यामध्ये फरक असतो. त्यामध्ये माझ्‍याबाबतीत काही लोकांचे गैरसमजही झाले आहेत. कारण मला हया खुर्चीवर बसविले गेले त्यावेळी प्रशासन आणि  लोकप्रतिनिधी या दोघांना बरोबर घेऊन चालायचे असते म्हणुन मी कधी माझ्या सदस्यांना कठोर होवून कायद्याचा बडगा दाखवुन शांत करण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते कधी नाराजही झाले असतील. मला प्रकर्षाने आठवण करुन द्यायची आहे त्या म्हणजे सदस्या सौ.कविता पाटील. त्या मगाशी म्हणाल्या अर्थसंकल्पावर मी भाषण कसे करु. परंतू मॅडम आपण चांगल्या प्रकारच्या बोलण्याच्या पध्दतीने, पोटतिडकीने बोलण्याची आपली पध्दत आहे ती वाखाणण्याजोगी आहे. थोडया काही चुका होतात, तुम्ही प्रत्येक मुद्दे मांडता ते एका बाजुने बरोबर असतात, पण आपण कधी कायद्याने कमी पडता म्हणून तुम्हाला न्याय मिळत नाही परंतू तुम्ही न्याय मिळवण्याचा प्रयत्न करता तो खरोखर सुंदर आहे. अजुन तुमचे स्थायी समिती सदस्य म्हणुन एक वर्ष आहे. तुम्हाला शिकायचे आहे. मी जरी नगरसेवक म्हणुन सिनियर असलो तरी, मीही पहिल्यांदाच स्थायी समिती सदस्य म्हणुन येथे आलो आहे. याअगोदर मी कधी स्थायी समिती सदस्य म्हणुन येथे आलेला नाही. मी अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्यामध्ये कमी पडलो. परंतू माझे दोन आधार येथे असल्यामुळे एक सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता. मला कसली अडचण आली नाही. मी कायद्याचा खुप अभ्यास केलेला आहे.मीही अनेक केसेस लढविल्या आहेत. परंतू ज्याचा अभ्यास नाही ते प्रांजळपणे कबुल करायला हरकत नाही. माझा अर्थसंकल्पावर अभ्यास नाही परंतू हे दोन हिरे आपल्या येथे आहेत यांना खरोखर पक्षाने हया ठिकाणी स्थायी समिती सदस्य म्हणुन ठेवले पाहिजे कारण जर आपल्याला हे प्रशासन चालवायचे असेल तर अशा अभ्यासू सदस्यांची आवश्यकता आहे. पुढेही स्थायी समिती सदस्य येतील परंतू तेही जर अभ्यासू नसतील तर स्थायी समिती सभा चालविणे मुष्किल होऊन जाईल. आपण येथे सदस्य म्हणुन असल्याने नवीन येणा-या सदस्यांना आपल्याकडून शिकता येईल.त्यांना अभ्यास करण्यास वाव मिळेल. सन्मा.सदस्य श्री.सामंत साहेब स्थायी समिती सदस्य आहेत त्यांचेकडून सौ.पाटील आपल्याला मार्गदर्शन मिळेल. मला सर्व अधिका-यांनी चांगले सहकार्य केले. मी प्रशासनाच्या काही चुका असतानाही सांभाळण्याचा प्रयत्न केला. परंतू काही अधिका-यांनी मला तेवढे सहाय्य करायला पाहिजे तेवढे केले नाही. तसेच आचारसंहितेमध्येही आपला सहा महिन्याचा कालावधी गेला आहे. प्रस्ताव येऊ शकले नाही. तसेच केंद्र सरकारकडून निधी मिळण्याबाबतही प्रयत्न करु शकलो नाही. त्यासाठी कदाचित आचारसंहितेचे कारण असेल

किंवा अनुदान मिळवण्यामध्ये आपण कमी पडलो असेल. परंतू वर्षभरामध्ये आपण चांगले सहकार्य केले.आपण हा अर्थसंकल्प चांगल्याप्रकारे मांडू शकलो. मला आनंद आहे की, हया वर्षीचा अर्थसंकल्प नागरिकांसाठी चांगला असेल. आज काही सदस्यांची फार अपेक्षा आहे.मीही सदस्य असताना माझ्याही अपेक्षा अशाच असायच्या, माझ्याही प्रभागातील चार रस्ते झाले पाहिजेत. मला पाणी मिळाले पाहिजे. जसे आपण पगारामध्ये महिन्याभरात काय काय घेऊ शकतो ते गणीत करुन ठरवितो त्याप्रमाणेच हा अर्थसंकल्प आहे जेवढी कमाई आहे तेवढाच खर्चही आहे. माझ्याकडे काही नगरसेवकांची अशीही पत्र आली आहेत त्यांनी दहा कोटी,बारा कोटी रुपयांच्या कामाची मागणी केली होती. तसे जर केले तर पुढील दहा वर्षाचा अर्थसंकल्प एकाच वर्षामध्ये संपुन जाईल. त्यामुळे आपण हे करु शकत नाही काही सदस्य नाराजही झाले असतील. मी सभापती असून माझे खुपसे प्रस्ताव असून मी ते देऊ शकलो नाही. अर्थसंकल्प पाहता मला माहिती आहे आपण ही कामे हया वर्षी नाही करु शकत. थोडेसे आपणही समजून घेतले पाहिजे जेवढा प्रयत्न करता येईल तेवढा प्रयत्न केला आहे.

सन २००९-१० सुधारित अंदाज जमा बाजू...
मा.आयुक्तांनी तयार केलेले रु. ११६१,७१,००,०००/-
स्थायी समितीने वाढ केलेली आहे रु.२७,९३,०००/-
स्थायी समितीने अंतिम शिफारस केलेली आहे रु.११६१,९९,००,०००/-

खर्च बाजू ....

| | |
|---|---|
| मा.आयुक्तांनी तयार केलेले | रु.११५९,८४,००,०००/- |
| अखेरची शिल्लक | रु.१,८६,००,०००/- |
| एकूण अंदाज | रु.११६१,७१,००,०००/- |

| | |
|---|---|
| स्थायी समितीने शिफारस केलेले | रु.११५७,३६,००,०००/- |
| अखेरची शिल्लक | रु.४,६३,००,०००/- |
| एकूण अंदाज | रु.११६१,९९,००,०००/- |

सन २०१०-२०११ चे मूळ अंदाजपत्रक
जमा बाजू
मा.आयुक्तांनी तयार केलेले आरंभीची शिल्लक रु १,८६,००,०००/-
जमा रु.१३२७,६१,००,०००/-
एकूण १३२९,४८,००,०००/-

स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाजपत्रक
जमा बाजू
आरंभीची शिल्लक रु.४,६३,००,०००/-
जमा रु.१३३३,३९,००,०००/-
एकूण रु.१३३८,०२,००,०००/-

खर्च बाजू :-
मा.आयुक्तांनी तयार केलेले
एकूण खर्च रु.१३२९,३५,००,०००/-
अखेरची शिल्लक रु.१२,६७,०००/-
एकूण रु.१३२९,४८,००,०००/-

स्थायी समितीने शिफारस केलेले
एकूण खर्च रु. १३३६,९९,००,०००/-
अखेरची शिल्लक रु.१,०३,००,०००/-
एकूण अंदाजपत्रक रु. १३३८,०३,००,०००/-

सन २०१०-२०११ चे अदांज अपेक्षित
शहर विकास विभाग रु. ९०,००,००,०००/- वाढ
जकात विभाग जमा रु.४२४,१५,००,०००/-
मालमत्ता कर जमा रु.१९२,२५,००,०००/-
पाणी पुरवठा आकार रु.८०,००,००,०००/-
एकूण महापालिका उत्पन्न रु.८७८,६०,००,०००/-

खर्च अपेक्षित रु.
खाजगीकरणातून प्रसाधनगृहे साफसफाई रु.५०,००,०००/- वाढ
एकूण तरतूद रु.१,००,००,०००/-
अनधिकृत बांधकामाचे नियंत्रण एकूण तरतूद रु.४,००,००,०००/-
शाळा सुरक्षारक्षक रु.१,००,००,०००/-
शाळा साफसफाई रु.१,००,००,०००/-
प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी रु.१,००,००,०००/-
व्हीटीपी पध्दतीने रस्ते नुतनीकरणासाठी रु.७५,००,०००/- वाढ

तलाव सुशोभिकरणासाठी रु.५०,००,०००/- वाढीव तरतूद
तरतूद रु.२,२५,००,०००/-

असे हे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. त्यास मंजूरी देऊन मा.महासभेस सादर करण्यासाठी शिफारस करीत आहे. आपण सर्वांनी मला सहकार्य केल्याबद्दल मी आभारी आहे. जय हिंद जय महाराष्ट्र !

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**विषय : सन २००९-२०१० च्या सुधारित अंदाजपत्रकाच्या जमा बाजूबाबत.**

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९५७ दिनांक २६.२.२०१०**

**ठ रा व :**

मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी सादर केलेल्या सन २००९-२०१० च्या सुधारित अर्थसंकल्पाबाबतची कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल विचारात घेऊन व तपशीलवार माहिती मागवून सोबतच्या तक्त्यातील फेरफारासहीत सन २००९-२०१० चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजाची जमा बाजू खालीलप्रमाणे संमत करीत असून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करीत आहे.

**जमा बाजू**

| | | |
|---|---|---|
| १. | महसुली जमा अ अंदाजपत्रक | रु. ६५९,८१,०१,००० /- |
| २. | महसुली जमा पाणी पुरवठा व मलनि:सारण | रु. ११७,६४,६५,०००/- |
| ३. | भांडवली जमा ( अ+क +JNNURM अंदाजपत्रक ) | रु. १५३,२६,८७,४८४ /- |
| | एकूण उत्पन्न | रु. ९३०,७२,५३,४८४ /- |
| ४. | आरंभिची शिल्लक | रु. २३१,२६,४६,७५२/- |
| | आरंभिच्या शिल्लकेसह एकूण | रु. ११६१,९९,००,२३६/- |

**सर्वानुमते मंजूर**

**सूचक : श्री.पांडुरंग पाटील** **अनुमोदक : श्री. हणमंत जगदाळे**

**सही /- चंद्रगुप्त घाग**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**विषय : सन २००९-२०१० च्या सुधारित अंदाजपत्रकाच्या खर्च बाजूबाबत.**

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९५८ दिनांक २६.२.२०१०**

**ठराव :**

मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी सादर केलेल्या सन २००९-२०१० च्या सुधारित अर्थसंकल्पाबाबतची कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल विचारात घेऊन व तपशीलवार माहिती मागवून सोबतच्या तक्त्यातील फेरफारासहीत सन २००९-२०१० चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजाची खर्च बाजू खालीलप्रमाणे संमत करीत असून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करीत आहे.

**खर्च बाजू**

| | | |
|---|---|---|
| १. | महसुली खर्च " अ " अंदाजपत्रक | रु.४०९,०४,८७,०००/- |
| २. | महसुली खर्च " क " अंदाजपत्रक | रु.११४,१०,१५,००० /- |
| ३. | भांडवली खर्च अ + क अंदाजपत्रक | रु.३३०,५५,७६,०००/- |
| ४. | भांडवली खर्च JNNURM | रु.३०२,६८,८३,९४३/- |
| | एकूण खर्च | रु.११५६,३९,६१,९४३/- |
| | अखेरची शिल्लक | रु. ५,५९,३८,२९३/- |
| | | ================ |
| | अखेरच्या शिल्लकेसह एकूण | रु.११६१,९९,००२३६/- |
| | | ================ |

**सर्वानुमते मंजूर**

**सूचक : श्री.पांडुरंग पाटील** **अनुमोदक : श्री. हणमंत जगदाळे**

**सही /- चंद्रगुप्त घाग**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

विषय : सन २००९-२०१० च्या सुधारित "क" अंदाजपत्रकाबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९५९ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

ठाणे महानगरपालिका, पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाचे क अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन अहवाल व विवरणपत्रे विचारात घेता, पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाचे सन २००९-१० चे सुधारित "क" अंदाजपत्रक खालीलप्रमाणे ही समिती संमत करीत असून मा.महासभेस अंतिम मान्यतेसाठी सादर करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पाणी पुरवठा विभाग जमा | रु | ८९,२६,७५,०००/- |
| २. | मलनि:सारण विभाग जमा | रु. | २८,३७,९०,०००/- |
| ३. | महापालिका निधीकडून वर्ग | रु. | ७५,५१,५०,०००/- |
| | एकूण जमा | रु. | १९३,१६,१५,०००/- |
| ४. | पाणी पुरवठा महसुली खर्च | रु. | १०७,२३,२५,०००/- |
| ५. | मलनि:सारण महसुली खर्च | रु. | ६,८६,९०,००० /- |
| ६. | भांडवली खर्च पाणी पुरवठा | रु. | ७५,०५,००,०००/- |
| ७. | भांडवली खर्च मलनि:सारण | रु. | ४,०१,००,०००/- |
| | एकूण खर्च | रु. | १९३,१६,१५,०००/- |

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**विषय : सन २०१०-२०११ च्या मूळ अंदाजपत्रकाच्या जमा बाजूबाबत.**

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६० दिनांक २६.२.२०१०**

**ठराव :**

मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी सादर केलेल्या सन २०१०-२०११ च्या मूळ अर्थसंकल्पाबाबतची कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल विचारात घेऊन व तपशीलवार माहिती मागवून सोबतच्या तक्त्यातील फेरफारासहीत सन २०१०-२०११ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजाची जमा बाजू खालीलप्रमाणे संमत करीत असून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करीत आहे.

**जमा बाजू**

| | | |
|---|---|---|
| १. | महसुली जमा अ अंदाजपत्रक | रु. ७४७,३३,०३,०००/- |
| २. | महसुली जमा पाणी पुरवठा व मलनि:सारण जमा | रु. १३६,७६,८७,०००/- |
| ३. | भांडवली जमा ( अ+क +JNNURM अंदाजपत्रक ) | रु. ४४९,२८,७३,११२/- |
| | एकूण उत्पन्न | रु. १३३३,३८,६३,११२/- |
| ४. | आरंभिची शिल्लक | रु. ५,५९,३८,२९३/- |
| | आरंभिच्या शिल्लकेसह एकूण | रु. १३३८,९८,०१,४०५/- |

**सर्वानुमते मंजूर**

**सूचक : श्री.पांडुरंग पाटील** **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

**सही /- चंद्रगुप्त घाग**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**विषय : सन २०१०-२०११ च्या मूळ अंदाजपत्रकाच्या खर्च बाजूबाबत.**

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६१ दिनांक २६.२.२०१०**

**ठराव :**

मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी सादर केलेल्या सन २०१०-२०११ च्या मूळ अर्थसंकल्पाबाबतची कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल विचारात घेऊन व तपशीलवार माहिती मागवून सोबतच्या तक्त्यातील फेरफारासहीत सन २०१०-२०११ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजाची खर्च बाजू खालीलप्रमाणे संमत करीत असून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करीत आहे.

**खर्च बाजू**

| | | |
|---|---|---|
| १. | महसुली खर्च " अ " अंदाजपत्रक | रु.४१०,७३,१६,०००/- |
| २. | महसुली खर्च " क " अंदाजपत्रक | रु.११८,२५,३७,००० /- |
| ३. | भांडवली खर्च अ + क अंदाजपत्रक | रु. ४११,५५,४६,०००/- |
| ४. | भांडवली खर्च JNNURM | रु. ३९८,३३,८७,८१२/- |
| | एकूण खर्च | रु.१३३८,८७,८६,८१२/- |
| | अखेरची शिल्लक | रु. १०,१४,५९३ /- |
| | | ================ |
| | अखेरच्या शिल्लकेसह एकूण | रु.१३३८,९८,०१,४०५/- |
| | | ================ |

**सर्वानुमते मंजूर**

**सूचक : श्री.पांडुरंग पाटील** **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

**सही /- चंद्रगुप्त घाग**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

विषय : सन २०१०-२०११ च्या मूळ " क " अंदाजपत्रकाबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६२ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

ठाणे महानगरपालिका, पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाचे क अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन अहवाल व विवरणपत्रे विचारात घेता, पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाचे सन २०१०-११ चे मूळ "क" अंदाजपत्रक खालीलप्रमाणे ही समिती संमत करीत असून मा.महासभेस अंतिम मान्यतेसाठी सादर करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पाणी पुरवठा विभाग जमा | रु | १०४,९४,०७,०००/- |
| २. | मलनि:सारण विभाग जमा | रु. | ३१,८२,८०,००० /- |
| ३. | महापालिका निधीकडून वर्ग | रु. | ५९,९३,५०,०००/- |
| | एकूण जमा | रु. | १९६,७०,३७,०००/- |
| ४. | पाणी पुरवठा महसुली खर्च | रु. | १११,४७,३४,०००/- |
| ५. | मलनि:सारण महसुली खर्च | रु. | ६,७८,०३,००० /- |
| ६. | भांडवली खर्च पाणी पुरवठा | रु. | ६३,१०,००,०००/- |
| ७. | भांडवली खर्च मलनि:सारण | रु. | १५,३५,००,००० /- |
| | एकूण खर्च | रु. | १९६,७०,३७,००० /- |

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**विषय : ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळास निधी देणेबाबत.**

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६३ दिनांक २६.२.२०१०**

**ठ रा व :**

ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळाने सादर केलेल्या सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजावर चर्चा करता, शिक्षण मंडळास सन २००९-१० चे सुधारित अर्थसंकल्पात खालीलप्रमाणे रु. ५१,७६,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकावन्न कोटी शहात्तर लक्ष मात्र) निधी वर्ग करणेस तसेच सन २०१०- ११ चे अर्थसंकल्पात खालील प्रमाणे रु.४७,००,००,००० /- (अक्षरी रक्कम रु.सत्तेचाळीस कोटी मात्र ) तरतूद वर्ग करण्यास ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

| अ.क्र. | लेखाशीर्ष | सन २००९-१० चे सुधारित अंदाज | सन २०१०-११ चे मूळ अंदाज |
|---|---|---|---|
| १ | वेतन व भत्ते | ३७,००,००,००० | ३३,४८,००,००० |
| २ | सेवानिवृत्ती वेतन | ५,७६,००,००० | ५,५२,००,००० |
| ३ | विविध योजना | ९,००,००,००० | ९,००,००,००० |
| | **एकूण** | **५१,७६,००,०००** | **४७,००,००,०००** |

**सर्वानुमते मंजूर**

**सूचक : श्री.पांडुरंग पाटील** **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

**सही /- चंद्रगुप्त घाग**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**विषय : ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमास निधी देणेबाबत.**

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६४ दिनांक २६.२.२०१०**

**ठ रा व :**

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन समितीने सादर केलेल्या परिवहन उपक्रमाच्या सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजावर चर्चा करता सन २००९-१० चे सुधारित अर्थसंकल्पात रु.११,७०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. अकरा कोटी सत्तर लक्ष मात्र ) तसेच सन २०१०-११ चे मूळ अर्थसंकल्पात रु.१०,००,००,०००/-(अक्षरी रक्कम रु. दहा कोटी मात्र ) तरतूद करणेंत आली असून ती अंतिम करणेस ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

**सर्वानुमते मंजूर**

**सूचक : श्री.पांडुरंग पाटील** | **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

**सही /- चंद्रगुप्त घाग**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**विषय : ठाणे महानगरपालिका क्षेत्र भूकंप प्रवर्गात मोडत असल्याने 'संरचना लेखा परिक्षण व तपासणी कक्ष' निर्मिती.**

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६५ दिनांक २६.२.२०१०**

**ठराव :**

ठाणे महानगरपालिका परिसराचे शासकीय यंत्रणेमार्फत भूकंपाबाबतचे सर्वेक्षणाच्या अहवालानुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्र हे भूकंप होऊ शकणाऱ्या क्षेत्रामध्ये आहे (सेसमिक झोन ॐ III) त्या दृष्टिने खालील प्रकारचा प्रस्ताव मांडण्यात येत असून सदर प्रस्तावाची गरज व संबंधित कायदेशीर तरतूदी या खालीलप्रमाणे आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात जुन्या इमारती कोसळून दुर्घटना घडलेल्या आहेत. सदर दुर्घटना रोखण्यासठी जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करून वेळीच योग्य ती कार्यवाही (इमारत दुरुस्ती अथवा इमारत खाली करून पुनर्बांधणी करणेस परवानगी) करणे अपेक्षित आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या उपविधी (Bye laws of Co-op. Housing Soc.) मध्ये कलम ७७ नुसार गृहनिर्माण संस्थेकडून इमारतींचे बांधकाम लेखा परिक्षण (Structural Audit) खालीलप्रमाणे होणे अपेक्षित आहे.

१) इमारतीचे बांधकाम वय १५ ते ३० वर्षे - ५ वर्षातून एकदा

२) ३० वर्षापेक्षा जादा बांधकाम वय – ३ वर्षातून एकदा

सदर जुन्या इमारती कोसळून झालेल्या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने १५ वर्षापेक्षा जास्त वय झालेल्या इमारतींचे लेखापरिक्षण करण्याबाबत ठराव पारित केलेला आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी महानगरपालिकेमार्फत होणे अभिप्रेत आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या इमारती कोसळून होणारी जिवित हानी व वित्त हानी थांबविण्यासाठी सदर इमारतींचे Structural audit अनिवार्य (Compulsory) करणे गरजेचे आहे. सदर Structural Audit करण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी संरचना लेखा परिक्षण व तपासणी कक्ष (Structural Audit & Checking Cell) ची स्थापना करणे आवश्यक आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात होणाऱ्या नवीन बांधकामांना ठाणे महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३,२५४ अन्वये व डी.सी. रेग्युलेशन कलम ५ अंतर्गत नवीन बांधकाम किंवा अस्तित्वातील बांधकामामधील फेरबदलाची माहिती देण्यात आल्यानंतर ठाणे महानगरपालिकेच्या डी.सी. रेग्युलेशन नुसार परवानगी देण्यात येते. सदर परवानगी देताना ठाणे महानगरपालिकेमार्फत इमारतींच्या नकाशांची तपासणी केली जाते परंतु सदर इमारती बांधण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या आर.सी.सी. डिझाईन व ड्रॉईंगची (स्ट्रक्चरल ड्रॉईंग व स्ट्रक्चरल कॅलक्युलेशन) बिल्डरकडून / विकासकाकडून मागणी करण्यात येत नाही व तपासणी करण्यात येत नाही तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५९ अन्वये नमुद केलेल्या नवीन बांधकाम चालू असताना इमारतींच्या बांधकामाची गुणवत्तेसाठी तपासणी (Quality Control Checking) ठाणे महानगरपालिकेमार्फत करणे शक्य होत नाही.

अस्तित्वातील पध्दतीनुसार फक्त नकाशानुसार इमारतीचे बांधकाम होत असल्याबद्दल तपासणी केली जाते. 'संरचना लेखा परिक्षण व तपासणी कक्ष' निर्माण झाल्यानंतर अशा प्रकारची स्ट्रक्चरल ड्रॉईंग व स्ट्रक्चरल कॅलक्युलेशन्सची तपासणी तसेच बांधकामांच्या गुणवत्तेची तपासणी करणे शक्य होणार आहे व त्यामुळे बांधकाम व्यवसायातील खालील प्रकारच्या चुकीच्या कामांच्या पध्दतींना (Malpractices) आळा घालण्यासाठी मदत होणार आहे.

१) IS Code / National Building Code नुसार इमारतींचे R.C.C. Designs न करणे व कमी स्टील वापरून इमारतींचे बांधकाम करणे.

२) IS Code / National Building Code नुसार क्राँक्रीटची ग्रेड न वापरणे. व कमकुवत इमारतींची निर्मिती करणे.

३) इमारतींचे बांधकाम करतेवेळी कमी सिमेंट वापरून प्लास्टरिंग, वॉटरप्रुफींगची कामे करणे.

४) पायाचे बांधकाम (Foundation), वीट बांधकाम, प्लास्टरिंग, पेंटिंग, दरवाजे, खिडक्या, जलवाहिनी, सॉईल वॉटर पाईपलाईन अशा प्रकारच्या कामांमध्ये कमी दर्जाचे मटेरियल वापरणे.

अशा प्रकारे नवीन बांधकामांची वेळोवेळी तपासणी 'संरचना लेखा परिक्षण व तपासणी कक्ष' यांचे मार्फत करून ठाणे महानगरपालिकेच्या अखत्यारितील इमारतींची बांधकामे सुरक्षेच्या दृष्टीने (Structural Safety) व गुणवत्तेच्या दृष्टिने (Quality of work) योग्य व उच्च प्रतीची निर्माण करणे शक्य होणार आहे. इमारतींची बांधकामे भूकंपविरोधी (Earthquake Resistant) तयार करण्यासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे म्हणून नवीन 'संरचना लेखापरिक्षण व तपासणी कक्ष' निर्माण केल्यास व बांधकामांना परवानगी देताना सदर बाबींची तपासणी करून बांधकामांना परवानगी दिल्यास ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींची गुणवत्ता वाढेल व सामान्य जनतेला त्यांच्या पैशाच्या मोबदल्यात चांगल्या प्रतीची बांधकाम असलेली घरे मिळतील.

ठाणे महानगरपालिका विविध प्रकल्पांसाठी लागणारे नकाशे, आर.सी.सी. डिझाईन व ड्रॉईंग इ. गोष्टी वास्तुविशारद व तांत्रिक सल्लागार यांच्या मार्फत तयार करून घेते व सल्लागारांना सुमारे ३ टक्के या दराने फी देते. सदर सल्लागारांनी तयार केलेले नकाशे, आर.सी.सी. डिझाईन व ड्रॉईंग यांची ठाणे महानगरपालिकेच्या अभियंत्यांकडून Cross Checking तपासणी (तांत्रिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या) करण्यासाठी 'संरचना लेखा परिक्षण व तपासणी कक्ष'ची (Structural Audit & Checking Cell) मदत घेणे शक्य होणार आहे.

संरचना लेखा परिक्षण व तपासणी कक्ष खालील प्रकारची कामे करील.

१) ठाणे महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी वास्तुविशारद (Architect), तांत्रिक सल्लागारांनी (RCC Consultants) तयार केलेले प्लॅन्स, स्ट्रक्चरल ड्रॉईंग्स व स्ट्रक्चरल कॅलक्युलेशन्स, स्पेसिफीकेशन्स यांची तपासणी व त्यानुसार तांत्रिक मान्यतेसाठी (Technical Sanction) शिफारस (Recommend) करणे किंवा तांत्रिकदृष्टया व आर्थिकदृष्टया योग्य पर्याय (Alternative proposal) सुचविणे.

२) एकाच कामासाठी उपलब्ध असलेल्या दोन किंवा त्यापेक्षा अधिक पर्यायांचा तुलनात्मक तांत्रिक अभ्यास करून योग्य पर्यायाची निवड करणे.

३) १५ वर्षांपेक्षा जास्त वय झालेल्या इमारतींचे बांधकाम लेखापरिक्षण (Structural audit) करण्याची कार्यवाही करणे. सदर कामासाठी संबंधित गृहनिर्माण संस्थेकडून फी आकारून ठाणे महानगरपालिकेसाठी महसूल जमा (Revenue generate) करणे.

४) नवीन बांधकामांना परवानगी देताना इमारतींचे नकाशे, स्ट्रक्चरल ड्रॉईंग व स्ट्रक्चरल कॅलक्युलेशन यांची तपासणी करणे तसेच इमारतींकरिता कमेन्समेंट सर्टिफिकेट देण्यापूर्वी सदर कक्षाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' देणे. बांधकाम धारकांकडून त्यासाठी फी आकारून ठाणे महानगरपालिकेसाठी महसूल जमा (Revenue generate) करणे.

५) नवीन इमारत बांधकामांची गुणवत्तेच्या दृष्टिकोनातुन Material/Workmanship यांची तपासणी करणे, चुकी सुधारण्यासाठी सुचना करणे व चुका दुरूस्त करून घेणे (डी.सी. रूल्स कलम १५९ अंतर्गत कार्यवाही करणे.

६) बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या नवीन प्रकारच्या Materials, Method of Design and Construction यांचा अभ्यास करून त्यांना मान्यता देणे किंवा ते नामंजुर करणे (डी.सी. रेग्युलेशन्स कलम १६०)

७) इमारतींचे बांधकाम D.C.Regulations च्या कलम १५९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे National Building Codes व I.S. Codes नुसार करून घेणे व बांधकाम योग्य न झाल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यकत्या चाचण्या करणे (डी.सी. रेग्युलेशन्स कलम १६१ अंतर्गत कार्यवाही करणे) तसेच इमारतींकरिता ऑक्युपन्सी सर्टिफिकेट देण्यापूर्वी सदर कक्षाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' देणे.

८) इमारतींचे टेरेसवर लावण्यात येणाऱ्या जाहिरात फलक (ॲडव्हर्टायझींग बोर्ड) टॉवर, सोलर पॅनल, वेदर शेड यांसाठी उभारण्यात येणाऱ्या स्टील स्ट्रक्चरसाठी तांत्रिक तपासणी करून मान्यता देणे.

९) धोकादायक इमारती बांधकाम यांचे सर्वेक्षण करून त्यांच्याबाबत दाखला देणे (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ अंतर्गत करण्यात येणारी कार्यवाही पूर्ण करणे)

१०) डी.सी. रेग्युलेशन्सच्या कलम २२ अंतर्गत इंजिनिअर्स, स्ट्रक्चरल इंजिनिअर्स व सुपरवायझर्स यांना लायसन्स देताना त्यांची पात्रता तपासून व मुलाखत किंवा चाचणी घेऊन लायसन्स देणे संबंधी कार्यवाही करणे.

११) ठाणे महापालिकेने लायसन्स दिलेले इंजिनिअर्स, स्ट्रक्चरल इंजिनिअर्स व सुपरवायझर्स हे करीत असलेल्या कामाची तपासणी करणे.

१२) इमारतींच्या बांधकामामधील गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी आवश्यकता भासल्यास डी.सी. रेग्युलेशन्स मध्ये सुधारणा किंवा नवीन नियम समाविष्ट करणेबाबत कार्यवाही करणे.

सदर 'संरचना लेखा परिक्षण व तपासणी कक्ष' हा स्वतंत्रपणे शहर विकास विभाग व नगर अभियंता यांचे अखत्यारीतील इमारती विभाग यांचे साठी काम करील.




सबब, ठाणे महानगरपालिका क्षेत्र हे भूकंप होणाऱ्या (सेसमिक झोन ३ॅ III) या पट्टयात असल्याने शासनाच्या वेळोवेळीच्या सुचनांनुसार महापालिकेच्या इमारती तसेच महापालिका हद्दीतील जुन्या व नव्याने उभारण्यात येत असलेल्या इमारतींमधील नागरिकांचे जिवित व वित्त हानीचे संरक्षण करण्याच्या दृष्टिने उपाय करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेमध्ये संरचना अभियांत्रिकीशी (Structural Engineering) निगडीत कामे पार पाडण्यासाठी स्वतंत्र 'संरचना लेखा परिक्षण व तपासणी कक्ष' (Structural Audit & Checking Cell) स्थापन करणेस ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

**सूचक :- श्री. पांडुरंग पाटील** **अनुमोदक :- श्री. हणमंत जगदाळे**

**सर्वानुमते मंजूर**

**सही /- चंद्रगुप्त घाग**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय : मार्ती वाहतुकीचे काम घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत करणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६६ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

ठाणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे रस्त्यावरील माती व रॅबिट उचलणे असे लेखाशीर्ष असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखील माती वाहतूक हे लेखाशीर्ष उपलब्ध आहे. दोन्ही लेखाशीर्षातील कामाचे स्वरुप सारखेच असून रस्त्यावरील माती व रॅबिट उचलण्याचे काम घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील असल्याने सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात माती वाहतूक या लेखाशीर्षाअंतर्गत रु.५ लक्ष तरतूद करण्यांत आली असून या लेखाशीर्षांतर्गत आयुक्तांनी प्रस्तावित केलेली तरतूद घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील रस्त्यावरील माती व रॅबिट उचलणे या लेखाशीर्षांतर्गत वर्ग करण्यांत आली असून सदरचे काम घनकचरा व्यवस्थापनामार्फत करणेसाठी ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

विषय : " अण्णाभाऊ साठे जयंती " हे नवीन लेखाशीर्ष तयार करणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६७ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

सन २०१०-११ चे अर्थसंकल्पात " अण्णाभाऊ साठे जयंती " या नावाने नवीन लेखाशीर्ष तयार करण्यांत आले असून या लेखाशीर्षांतर्गत रु. ५ लक्ष तरतूद करण्यांत आली आहे. त्यास अंतिम मान्यता देणेस ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील — अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

विषय : " दृक्‌श्राव्य विभाग ( प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ) " हे नवीन लेखाशीर्ष तयार करणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६८ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

शिक्षण विभागाची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रचलित पद्धतीत बदल घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातून दृक्‌श्राव्य पद्धतीने जर विद्यार्थ्यांना शिक्षण दिले तर त्यांच्या चांगले लक्षात रहाते, म्हणून सन २०१०-११ चे अर्थसंकल्पात " दृक्‌श्राव्य विभाग ( प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ) " या नावाने नवीन लेखाशीर्ष तयार करण्यांत आले असून या लेखाशीर्षांतर्गत रु. १ कोटी तरतूद करण्यांत आली आहे. त्यास अंतिम मान्यता देणेस ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील — अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय : प्राथमिक शाळांची साफसफाई व सुरक्षा व्यवस्थेचा खर्च महापालिकेमार्फत करणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९६९ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

ठाणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण मंडळाकडील शाळांची साफसफाई व सुरक्षा व्यवस्था ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळामार्फत करण्यांत येते. काही शाळांमध्येच महापालिकेच्या बालवाडया तसेच माध्यमिक शिक्षण मंडळाकडील वर्ग भरत असल्याने शाळांची साफसफाई तसेच सुरक्षा व्यवस्थेसाठी शिक्षण मंडळाकडे निधी वर्ग न करता सदरचा खर्च महापालिकेमार्फत करण्यांत यावा यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष शाळांची साफसफाई या अंतर्गत रु.१कोटी व शाळांची सुरक्षा व्यवस्था या अंतर्गत रु. १ कोटी तरतूद करणेस ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय : दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृहाचे खाजगीकरण.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९७० दिनांक २६.२.२०१०

ठ रा व :

दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृहाची निर्मिती ॲथलेटिक्स व क्रिकेटच्या खेळाडूंना योग्य दर्जा मिळावा या दृष्टिकोनातून करण्यांत आली आहे. परंतु गेली अनेक वर्षे या क्रिडाप्रेक्षागृहावर रणजी क्रिकेट स्पर्धा किंवा अन्य स्पर्धा आपण घेवू शकलो नाही. त्यामुळे ठाण्यातील क्रिकेट प्रेमींना याचा आस्वाद घेता आला नाही. तसेच या वास्तूच्या देखरेख व दुरुस्तीसाठी आपल्याला लाखो रुपये खर्च होत आहे. परंतु उत्पन्न मात्र नाममात्र मिळत आहे. त्यामुळे सदर वास्तूचे खाजगीकरण करुन एखाद्या संस्थेला उपलब्ध करुन दिल्यास ठाण्यातील क्रिकेट प्रेमींना निश्चितच रणजी किंवा अन्य क्रीडा स्पर्धांचा लाभ घेता येईल. तरी, दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृहाचे खाजगीकरण करण्यांत यावे अशी शिफारस ही समिती मा.महासभेस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग

सभापती,

स्थायी समिती,

ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय : <u>अनधिकृत नळ कनेक्शन दंडाबाबत.</u>

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९७१ दिनांक २६.२.२०१०

<u>ठराव :</u>

ठाणे महापालिका हद्दीत अनधिकृत नळ कनेक्शन घेतल्यास त्यावर दंड आकारुन तो नियमित करणेबाबत ठराव यापुर्वीच झालेला आहे. परंतु सदरची दंडाची रक्कम जास्त असल्याने झोपडपट्टीतील नागरिक सदरचा दंड भरुन अनधिकृत नळ कनेक्शन नियमित करीत नाहीत व त्यामुळे महापालिकेस दरमहा पाणी पुरवठा आकारापासून मिळणा-या उत्पन्नाला मुकावे लागते. त्यामुळे खालीलप्रमाणे दंड आकारणेस ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

| अ.क्र. | तपशील | ३ महिन्यापर्यंत दंडाची रक्कम | ३ महिन्यानंतर दंडाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | झोपडीधारकांना | १,०००/- | १,५००/- |
| २ | इमारती फ्लॅटधारकांना | ३,०००/- | ५,०००/- |

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय : जलकुंभावर सुरक्षा रक्षक नेमणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९७२ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

महापालिकेने स्वत:च्या पाणी पुरवठा योजना व वितरण व्यवस्थेअंतर्गत ठिकठिकाणी जलकुंभ बांधले आहेत. सद्य:स्थितीत एकूण ३३ जलकुंभ कार्यान्वीत आहेत. सदर जलकुंभावर सुरक्षा नेमण्याबाबत पोलिस विभागाकडूनही प्रशासनाला लेखी स्वरुपात कळविण्यांत आले आहे. जलकुंभांवर सुरक्षा रक्षक नेमण्यासाठी अत्यावश्यक बाब म्हणून त्वरीत सुरक्षा रक्षक नेमणेबाबत ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय : मंजूर रिक्त पदे त्वरीत भरणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९७३ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

सन २००९-२०१० चे सुधारित व सन २०१०-११ चे अर्थसंकल्पावर संबंधित विभाग प्रमुखांशी चर्चा करता ब-याच विभागामध्ये कर्मचारी वर्ग अपुरा असल्याचे निदर्शनास आले आहे. महसुल प्राप्त करणा-या विभागांकडे कर्मचारी अपुरे असल्याने महापालिकेच्या महसुलावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे महापालिकेत मंजूर परंतु रिक्त असलेली पदे त्वरीत भरुन वसुली करणा-या विभागांकडे वर्ग करण्यांत यावेत अशी शिफारस ही समिती मा.महासभेस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील | अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय :रस्ता रुंदीकरणातील बाधीत रहिवाशांना घरे उपलब्ध करुन देणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९७४ दिनांक २६.२.२०१०

ठ रा व :

महापालिकेने हाती घेतलेल्या रस्ता रुंदीकरणांतर्गत बरेच झोपडीधारक बाधीत झाले होते. यापैकी काही जणांचे पुनर्वसन करण्यांत आले असले तरी, जागे अभावी अनेक झोपडीधारकांना अद्यापही जागा उपलब्ध करुन देण्यांत आलेली नाही. आता महापालिकेकडे संक्रमण शिबीर , एस.आर.डी. व बी.एस.यु.पी. अंतर्गत नवीन घरे उपलब्ध झाली असल्याने या बाधीत झोपडीधारकांना या नवीन जागेत घरे उपलब्ध करुन द्यावीत अशी शिफारस ही समिती मा.महासभेस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय : महापालिकेच्या रुग्णालयांसाठी बाजारात वापरात असलेलीच औषधे उपलब्ध करुन घेणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९७५ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय तसेच इतर रुग्णालयात डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे उपलब्ध नसतात व ती बाहेरुन खरेदी करावी लागतात. सदरची औषधे महाग असली तर गरीबांना ती घेणे देखील परवडत नाहीत. त्यामुळे वेळोवेळी बाजारात प्रचलित व वापरात असलेल्या औषधांचाच समावेश औषधांच्या निविदा मागवितांना करण्यांत यावा असे ही समिती मा.महासभेस शिफारस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय : <u>महापालिकेच्या उद्यानांची निगा खाजगी संस्थेमार्फत करणेबाबत.</u>

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९७६ दिनांक २६.२.२०१०

ठराव :

महापालिकेने विविध ठिकाणी चांगली उद्याने तयार केली आहेत. परंतु सदरच्या उद्यानांची निगा व देखभाल व्यवस्थित न झाल्यास केलेला खर्च वाया जातो तसेच नागरिक या उद्यानांचा लाभ घेत नाहीत. मोकळया जागेच्या अभावामुळे लहान मुलांना खेळण्यास जागा उपलब्ध नसते. त्यामुळे महापालिकेने बांधलेली उद्यानांची निगा, देखभाल व सुरक्षेचे कामकाज खाजगी सेवाभावी संस्था अथवा महिला बचत गटास सोपविल्यास उद्याने सुस्थितीत राहू शकतील. त्यामुळे जास्तीत जास्त उद्यानांच्या निगा, देखभाल व सुरक्षेचे काम सेवाभावी संस्था किंवा महिला बचत गटास देण्यांत यावे अशी शिफारस ही समिती मा.महासभेस करीत आहे.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

विषय : बोर्डाचे सुरक्षा रक्षक न घेता खाजगी एजन्सीकडून सुरक्षा रक्षक घेणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९७७ दिनांक २६.२.२०१०

ठ रा व :

महापालिकेने महापालिका कार्यालये तसेच रुग्णालयांमध्ये बोर्डाचे सुरक्षा रक्षक नेमले आहेत. सदर सुरक्षा रक्षक भरतांना बोर्ड ज्यांची नियुक्ती करेल अशा व्यक्तींना सुरक्षा रक्षक म्हणून पाठविण्यांत येते. या सुरक्षा रक्षकांवरील वेतनाचा खर्च देखील जास्त होतो व त्याप्रमाणात मात्र सुरक्षा पुरविली जात नाही. त्यामुळे ही समिती महासभेस शिफारस करीत आहे की, यापुढे बोर्डाचे सुरक्षा रक्षक न नेमता महापालिकेने खाजगी एजन्सीकडून सुरक्षा रक्षक नेमावेत जेणे करुन महापालिकेचा खर्च कमी होवून चांगल्या प्रकृतीचे सुरक्षा रक्षक उपलब्ध होवून महापालिकेच्या मालमत्तांचे संरक्षण होईल.

सर्वानुमते मंजूर

सूचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सही /- चंद्रगुप्त घाग
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक ६ : मा.आयुक्त सो. यांनी मा.स्थायी समितीच्या दि. २०.२.२०१० रोजीच्या सभेत सादर केलेल्या ठाणे महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**विषय : फायरमन संवर्गातील मंजूर पदे त्वरीत भरणेबाबत.**

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९७८ दिनांक २६.२.२०१०**

**ठराव :**

**महापालिकेचे सद्या ५ ठिकाणी फायर स्टेशन असून लवकरच अन्यत्र ३ ठिकाणी (दिवा, कोलशेत व ओवळा ) फायर स्टेशन उभारण्यांत येणार आहेत. या फायरस्टेशन साठी फायरमन या संवर्गात मंजूर असलेली पदे त्वरीत भरण्यांत यावीत अशी शिफारस ही समिती मा.महासभेस करीत आहे.**

**सर्वानुमते मंजूर**

**सूचक : श्री.पांडुरंग पाटील** **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

**सही /- चंद्रगुप्त घाग**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

( तद्नंतर मा. सभापती, स्थायी समिती सायं.५.०० वा. सभा संपल्याचे जाहीर करतात. )

सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

( सौ. छाया मानकर )
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा संपल्याची वेळ सायं.५.०० वा.
दि. २६.२.२०१०
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.